# दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अकोला
## सन २०२५-२०२६ करीता कर्जे व देखरेख विभागा संबंधी फॉर्मस् छपाई बाबतचे नियम व अटी

१) बँकेला खालील प्रमाणे बुकलेट छपाई करावयाचे आहे.
१. मध्यम/दिर्घमुदती कर्जाचे १००० नग बुकलेट

२) वरील प्रमाणे बुकलेट छपाई करावयाचे असून कव्हर पेज करीता आर्ट पेपर १७० ग्रॅम व आतील पान छपाई करीता मॅपलिथो ७० ग्रॅम पेपर वापरावा.

३) निविदा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कचेरी, सिव्हील लाईन, अकोला या नावाने पाठवावीत.

४) सशर्त निविदा पाठवु नये सशर्त निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

५) छपाईचा नमुना दि. 10/12/2025 पासून कार्यालयीन वेळात बँकेच्या स्टेशनरी विभागात पाहावयास मिळेल नमुना काळजीपूर्वक पाहुनच दर भरावेत. त्यानंतर कोणत्याही सबबीवर वाढीव दर मंजूर केले जाणार नाहीत.

६) निविदेमधील दर सर्व टॅक्सेससह असावेत. निविदा भरणारे पार्टीजवळ व्हॅट नंबर असणे आवश्यक आहे. निविदा संबंधीत फर्मचे नावाने असलेल्या लेटर पॅडवरच प्रोप्रायटरचे स्वाक्षरी सह असावी.

७) निविदे सोबत कागदाचे नमुने सादर करावे लागतील. त्यावर पेपरचा तपशिल निविदा धारकाचे नाव, सही असणे आवश्यक राहील. पेपर नमुने नसलेले निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

८) छपाई काम दिलेल्या मुदतीत पुर्ण करून न दिल्यास १०% रक्कम दंड म्हणुन बिलातुन कपात करण्याचा बँकेस अधिकार राहील व कपात केलेली रक्कम परत दिली जाणार नाही.

९) छपाई करीता छपाई कामाचे यादीत ऑर्डरमध्ये नमुद केलेलाच पेपर वापरावा लागेल.

१०) छपाई काम नमुन्यानुसार समाधानकारक नसल्यास अगर त्यामध्ये कोणतीही उणीव असल्यास छपाई पुर्णत: नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील. त्याबाबत नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही.

११) छपाईची ऑर्डर दिल्यानंतर ठरलेल्या मुदतीत छपाई न पुरविल्यास सदर छपाई ईतरांकडुन करून घेण्यात येईल व त्या अनुषंगाने होणारा सर्व प्रकारचा अतिरिक्त खर्च छपाई काम मंजूरात असलेल्या निविदा दाराकडून वसुल करण्यात येईल.

१२) ऑर्डर मधील पुर्ण ॲटम एकाच वेळी बँकेत द्यावे लागेल. अपूर्ण ॲटम स्विकारण्यात येणार नाही.

१३) छपाई ऑर्डर पोटी ॲडव्हान्स मिळणार नाही.

१४) छपाई ऑर्डर पुरविणेस मुदतवाढ कोणत्याही परिस्थितीत मिळणार नाही.

१५) छपाई निविदा भरले पासून सदर दर ९० दिवस वैध राहतील. सदर कालावधीत बँकेच्या आवश्यकतेनुसार कधीही ऑर्डर देण्यात येईल. सदर दर आपणास बंधनकारक राहतील.

१६) अंतिम छपाई पूर्वी प्रुफ तपासुन छपाई करण्यात यावी.

१७) कोणतेही निविदा मंजूर करणे, नामंजूर करणे,निविदा कुठलेही कारण न देता रद्द करणे, अटी व शर्तीत बदल करणे बाबतचा अधिकार बँक राखुन ठेवत आहे.

निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. 12/12/2025
वेळ दुपारी ५.०० वाजे पर्यंत.

The Akola-Washim Dist.C.Co-op.Bank Ltd. H.O. AKOLA

मुख्य कार्यकारी अधिकारी

Estate.Record/29